# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/05/2023 (गुरूवार) सकाळ

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. सावनेर:— फिर्यादी/पिडीता वय ४५ वर्ष यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप क्र. ६६/२०२१ कलम ३७६, ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी व **आरोपी नामे— आकाश चंदन नाईक, वय २७ वर्ष, रा. निळगाव ता. कळमेश्वर** हे एकमेकांचे घराशेजारी राहत असुन फिर्यादी काम करीत असलेल्या शेतावर फिर्यादीस एकटी पाहुन तिला पकडुन ओढुन व हातातील विळा दाखवुन तिला जिवे मारण्याची धमकी देवुन तिचाशी जबरदस्तीने जबरी संभोग केला.

सदर प्रकरणाचे तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक रासकर मॅडम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ११/०५/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती नागुर मॅडम यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम ३७६ भांदवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद कलम ५०६ (२) भादंवि. मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १,०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महीने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती सायखेडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा/३७६ मधुकर आदमने पोस्टे सावनेर यांनी मदत केली आहे.

## अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींवर कारवाई

पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर मौजा चिचदा शिवार चिचदा ते नवेगाव रोड येथे दिनांक १०/५/२०२३ चे ०९/०० वा. ते ०९/४० वा. दरम्यान पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन देवलापार हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना **आरोपी नामे —गणपत वसंता ठाकरे, वय ४७ वर्ष, रा. शिवाजी वार्ड ता. रामटेक** हा त्याचे ताब्यातील लाल रंगाचा एक महेन्द्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/एल— ३२१२ व लाल रंगाची ट्राली क्र. एम. एच.—४० ए. एम.— २०१० मध्ये रेती भरून शासनाचा कर चुकवुन विनापरवाना गौण खनिज (रेती) ची नाल्यातुन चोरी करून व चोरटी वाहतुक करतांनी पंचासमक्ष मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातुन लाल रंगाचा एक महेन्द्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/एल— ३२१२ व लाल रंगांची ट्राली क्र. एम. एच.—४०/ ए. एम २०१० मध्ये किंमती ४०००००/—रू व एक ब्रास रेती किंमती ५०००/—रू असा एकुण ४०५०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी देवलापार पोलीसांनी, पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादवी, सहकलम ३/१८१, १४६/१९६ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोना. मोरेश्वर नागोसे ब. नं. १६८८ पोस्टे देवलापार मो. क्र. ८६००६५५०८५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर